# पिकावरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प
## कीटकशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी
इ-मेल- entomkv@gmail.com


जा.क्र. जिझेडई/क्रॉपसॅप/ ४०० /२६
दिनांक: १९.०८.२०२६

## आवाहन क्र. १२

## कपाशीवरील रसशोषक किडींचे असे करा एकात्मिक व्यवस्थापन

कपाशीवरील तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे व मावा यांसारख्या रसशोषक किडींमुळे पिकाचे १६ ते २७ टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी किडींचे नियमित निरीक्षण करून अनावश्यक रासायनिक कीटकनाशकांचा वापर टाळावा आणि जैविक, यांत्रिक व रासायनिक उपायांचा योग्य समन्वय साधून एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंबनाचा सल्ला वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील किटकशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अनंत लाड, डॉ. पुरुषोत्तम नेहरकर, डॉ. राजरतन खंदारे, डॉ. योगेश मात्रे यांच्या वतीने देण्यात आला आहे.

**तुडतुडे:** तुडतूडे हे पाचरीच्या आकाराचे व फिक्कट हिरव्या रंगाचे असतात. ते नेहमी तिरके चालतात. प्रौढ व पिल्ले पानांच्या खालच्या बाजूने राहून रस शोषण करतात. रस शोषण करताना आपली विषारी लाळ त्यात सोडतात. अशी पाने प्रथम कडेने पिवळसर होऊन नंतर तपकिरी रंगाची होतात. जास्त प्रादुर्भाव झाल्यास संपूर्ण पाने लाल तांबडी होतात परिणामी झाडाची वाढ खुटते. कोरडवाहू कपाशीवर सर्वसाधारणपणे जुलै च्या शेवटच्या आठवडयापासून या किडीचा प्रादुर्भाव सुरु होतो व सर्वात जास्त प्रादुर्भाव हा ऑगस्टचा शेवटचा आठवडा ते सप्टेंबर चा दुसरा आठवडा या कालावधीत आढळून येतो.

**पांढरीमाशी:** प्रौढ माशी आकाराने लहान व पंख पांढरे असून शरीरावर पिवळसर झाक असते, डोक्यावर दोन तांबडे ठिपके असतात. प्रौढ व पिल्ले पानाच्या खालच्या बाजूने राहून रसशोषण करतात अशी पाने कोमजतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास पाने लालसर ठिसूळ होऊन शेवटी वळतात याशिवाय पिल्ले आपल्या शरीरातून गोड चिकट द्रव बाहेर टाकतात त्यामुळे पानावर काळी बुरशी वाढते. तसेच पांढरीमाशी रोगाचा प्रसार करते. या किडीचा प्रादुर्भाव कोरडवाहू कपाशीवर सप्टेंबर महिन्यापासून सुरु होतो व नोव्हेंबर महिन्यात अधिकतम प्रादुर्भाव दिसून येतो.

**फुलकिडे:** प्रौढ फुलकिडे अतिशय लहान फिक्कट पिवळसर अथवा तपकिरी असून त्यांच्या पंखाच्या कडा केसाळ दिसतात. प्रौढ व पिल्ले कापसाच्या पानामागील भाग खरवडून त्यातून निघणारा रस शोषण करतात. प्रादुर्भाव ग्रस्त भाग प्रथम पांढुरका व नंतर तपकिरी होतो. यामुळे

पाने फुलकळ्या आकसतात, झाडाची वाढ खुंटते व बोंडे चांगली उमलत नाहीत. या किडीचा प्रादुर्भाव कोरडवाहू कपाशीवर सर्वसाधारणपणे ऑगस्टच्या दुसऱ्या पंधरवाड्यापासून सुरु होतो. अधिकतम प्रादुर्भाव हा सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवाड्यात दिसून येतो.

**मावा:** पूर्ण वाढ झालेली मावा रंगाने पिवळसर ते गडद हिरवी असते. शरीराने मृदू असून पोटाच्या मागच्या बाजूस शिंगा सारखी दोन टोके असतात. प्रौढ व पिल्ले पानाच्या खालच्या बाजूने व कोवळ्या शेंड्यावर समूहाने राहून त्यातील रस शोषण करतात. अशी पाने आकसतात व मूरगळतात त्यामुळे झाडाची वाढ खुंटते. या किडीचा प्रादुर्भाव रोपवास्थेत तसेच शेवटच्या अवस्थेत दिसून येतो. कोरडवाहू कपाशीवर सर्वात जास्त प्रादुर्भाव हा जुलै च्या शेवटच्या आठवडा ते ऑगस्ट चा दुसरा आठवडा आणि पिकाच्या शेवटी डिसेंबर जानेवारी महिन्यात आढळून येतो.

**एकात्मिक व्यवस्थापन :**

- किडींचे नियमित निरीक्षण करावे.
- अंतर मशागत करून पिक तण विरहीत ठेवावे.
- नत्र खताचा संतुलित वापर करावा.
- मित्र कीटकांचे संवर्धन करावे.
- रसशोषक किडीना खाणारा ढाल कीडा व क्रायसोपा या मित्र किटकाचे प्रौढ व अळ्या दिसून आल्यास त्याचे संवर्धन करावे व किटकनाशकांची फवारणी टाळावी.
- प्रादुर्भाव ग्रस्त गळालेली पाते व बोंडे जमा करून नष्ट करावी.
- पांढ-या माशांना आकर्षित करण्यासाठी पिवळे चिकट सापळे तर फुलकिडी साठी निळे चिकट सापळे १० ते १२ प्रती हेक्टरी लावावेत.
- पिठया ढेकणासाठी व्हर्टीसीलीयम लिकॅनी १.१५ टक्के डब्लूपी या बुरशीची ४० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा अॅझाडीरॅक्टीन ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी.
- **रासायनिक पध्दत :**

  किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्या नंतरच शिफारशी/लेबलक्लेम नुसार खालील रासायनिक किटकनाशकांचा आलटून पालटून वापर करावा.

| किडी | किटकनाशके | मात्रा प्रति लीटर पाणी |
|---|---|---|
| तुडतुडे, फुलकिडी, पांढरी | फ्लोनीकॅमीड ५०% डब्ल्युजी किंवा | ०.२ ग्रॅम |
| | थायमिथोक्झाम २५% डब्लूजी किंवा | ०.२ ग्रॅम |
| | डायफेन्थुरॉन ५०% डब्ल्युपी किंवा | १.२ ग्रॅम |


| | | |
|---|---|---|
| **माशी, मावा** | बुप्रोफेझीन २५% एससी किंवा | २ मिली |
| | फिप्रोनील ५% एससी किंवा | ३ मिली |
| | ॲसीफेट ५०% + इमिडाक्लोप्रीड १.८% एसपी किंवा | २० ग्रॅम |
| | फिप्रोनिल ५% + बुप्रोफेझिन २०% एससी किंवा | २ मिली |
| | फिप्रोनिल ०४% + ॲसिटामिप्रिड ०४ % एससी किंवा | २ मिली |
| | पायरीप्रॉक्सीफेन ०५% + डायफेंथियुरॉन २५% एसई किंवा | २ मिली |
| | क्लॉथियानिडिन ३.५% + पायरीप्रॉक्सीफेन ८% एसई किंवा | २.५ मिली |
| | पायरीप्रॉक्सीफेन ८% + डिनोटेफुरान ५% + डायफेंथियुरॉन १८%एससी | १.२ मिली |
| | डायफेंथियुरॉन ३० % + पायरीप्रॉक्सीफेन ८% एससी किंवा | २ मिली |
| | डिनोटेफुरान ४ % + ॲसीफेट ५०% एसजी | १.८ ग्रॅम |

**नोट :** वरील कीटकनाशकाचे प्रमाण साध्य/नॅपसॅक पंपासाठी आहे पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. पायरेथ्रॉईड गटातील कीटकनाशकाची फवारणी नोव्हेंबर महिन्याअगोदर सुरु करू नये यामुळे पांढऱ्या माशीचा उद्रेक होऊ शकतो.


समन्वयक अधिकारी
क्रॉपसॅप प्रकल्प तथा सहाय्यक प्राध्यापक
कीटकशास्त्र विभाग,
वनामकृवि,परभणी

**प्रत :**


१. मा. संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव
२. मा. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, म.रा., पुणे यांना माहितीस्तव
३. मा. विभागीय कृषि सहसंचालक, लातूर/छ.संभाजीनगर यांना कार्यवाहीस्तव




तुडतुडे




पांढरीमाशी




फुलकिडे



मावा